राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
Website- www.sic.maharashtra.gov.in
दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार
क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र-१२२/२०२४/नाशिक.

तक्रारदार	प्रतिवादी
	जन माहिती अधिकारी
श्री. ज्ञानेश्वर विठ्ठल कदम, रा.मोरया नगरी, रखमाई नगर चाळ नं.६,रुम नं.६, आशेळेपाडा उल्हासनगर, जि.ठाणे-४२१००४.	पुरवठा अव्वल कारकुन, धान्य वितरण अधिकारी कार्यालय, डिस्टलरी क्वॉर्टर, शासकिय गोदामाजवळ, नाशिकरोड, ता.जि.नाशिक.

सुनावणी दिनांक १५/०७/२०२५

तक्रारदार यांनी दि. २७/०२/२०२४ रोजीच्या अर्जान्वये, "दि.२२/०९/२०२३ रोजी धान्य वितरण अधिकारी यांचेकडे माहिती अधिकारात अर्ज दाखल केलेला आहे. विहीत मुदतीत अपेक्षित माहिती उपलब्ध न झाल्यामुळे तक्रारदार यांनी व्यथित होवुन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(१) अंतर्गत प्रथम अपील अर्ज दाखल केला. प्रथम अपील अर्जावर दिनांक ०२/०१/२०२४ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश पारित केला. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी ७ दिवसाच्या कालावधी संपल्यानंतर देखील आजपावेतो तक्रारदार यांना अपेक्षित माहिती पुरविलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे अनुपालन केलेले नाही. मा. आयोगास विनंती की (१) जन माहिती अधिकारी विरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करणेत यावी. (२) मा. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार तकारदार यांना माहिती विनामूल्य उपलब्ध करून दयावे." असे तक्रारदार यांनी नमूद करुन माहितीचा अधिकार अधिनियमांतील कलम १८ अंतर्गत आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

२) सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि. १५/०७/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी हे उपस्थित असून विद्यमान जन माहिती अधिकारी व तक्रारदार हे अनुपस्थित होते.

३) तक्रारदार यांनी त्यांच्या दि. २२/०९/२०२३ रोजीच्या मुळ माहिती अर्जान्वये मार्च २०१० पासून या कालावधीतील, जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"आपल्या कार्यक्षेत्रातील नाशिक, विहितगाव येथील शासनमान्य शिधा वाटप दुकान क्र. च्या शिधा पत्रिका मध्ये शिधापत्रिका धारक श्री. प्रकाश विठ्ठल कदम यांच्या शिधापत्रिकेत श्री. ज्ञानेश्वर विठ्ठल कदम यांच्या नावाची नोंद झाल्याबाबतची नोंदणी तारीख व नमूद मुळ कागद पत्रांच्या छायांकित प्रती सांक्षाकित करून देणे बाबत माहिती."

तसेच जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त न झालेने तक्रारदार यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक. १४/१२/२०२३ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे.

४) सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांच्या दि. २२/०९/२२३ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि. ०६/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या उत्तराची प्रत आयोगास सादर केलेली असून त्यात असे नमूद केले आहे की, आपला दि.२२/०९/२०२३ रोजीचा अर्ज दि. २५/०९/२०२३ रोजी या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये आपण मागणी केलेल्या माहितीचा तपशिल खालील प्रमाणे उपलब्ध करुन देत आहोत.

"शिधापत्रिका वितरीत केले नंतर १ वर्ष कालावधी पर्यंत कागदपत्रे जतन केली जातात व त्यानंतर नियमानुसार D कागदपत्र म्हणुन त्यांची विल्हेवाट लावण्यात येते. तसेच त्रयस्थ व्यक्तीची माहिती पुरविणे माहिती अधिकारात अभिप्रेत नाही. तरी आपला दिनांक २५/०९/२०२३ रोजीचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे."

५) सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, तक्रारदार यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा धान्य वितरण अधिकारी, नाशिक यांचेकडे दि. १४/१२/२०२३ रोजी दाखल केलेले प्रथम अपील दि. ०३/०१/२०२४ रोजीच्या खालील आदेशान्वये निकाली काढलेले आहे.

"अपिलकार यांना आवश्यक असलेली माहिती व जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती या मध्ये विसंगती आहे तरी अपिलकार यांना आवश्यक असलेली माहिती ०७ दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे नियमातील विहीत तरतुदी व कालमर्यादेचे काटेकोरपणे पालन करावे अशी सक्त ताकीद देणेत येत आहे." मात्र संबंधित जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या दि. ०३/०१/२०२४ अन्वये पारीत केलेल्या आदेशानूसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१) विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, धान्य वितरण अधिकारी यांचे कार्यालय, नाशिक यांनी सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी तथा धान्य वितरण अधिकारी, नाशिक यांच्या दि.०३/०१/२०२४ च्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

२) प्रथम अपिल सुनावणीवेळी कार्यरत जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, धान्य वितरण अधिकारी यांचे कार्यालय, नाशिक यांनी (दि. ०२/०१/२०२४ रोजी कार्यरत) संदर्भात दि.०३/०१/२०२४ अन्वये पारीत केलेल्या आदेशास अनुसरुन तक्रारदार यांना माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) वरील निर्देशांसह प्रस्तुत तक्रार क्र. १२२/२०२४/ नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

जावक क्र. 290

01 JAN 2026